**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**गुरुवार दिनांक १३ फेब्रुवारी २०२५**

**ठळक बातम्या**

1. **लोकसभेत प्राप्तिकर विधेयक सादर, लोकसभेचं कामकाज १० मार्चपर्यंत स्थगित.**
2. **जलयुक्त शिवार अभियानातून महाराष्ट्र जलक्रांतीच्या दिशेने वाटचाल करत करत असल्याचे - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन, मृद आणि जलसंधारण विभागात रूजू झालेल्या 601 अधिकाऱ्यांना नियुक्तीपत्राचे वितरण.**
3. **विकसित राष्ट्र बनण्यासाठी कोळसा उत्पादन वाढवणं गरजेचं असल्याचं केंद्रीय कोळसा आणि खाण मंत्री जी.किशन रेड्डी यांचं प्रतिपादन.**
4. **एकात्मिक बाल विकास सेवा योजनाअंतर्गत १८ हजार ८८२ पद भरती करणार - महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे.**

--------------------------------

**संसद**

**अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आज लोकसभेत प्राप्तिकर विधेयक २०२५ सादर केलं. स्थायी समितीकडे हे विधेयक पाठवायचा प्रस्ताव मांडण्यात आला आहे. प्राप्तिकराशी संबंधित कायद्यात सुधारणा करण्याच्या उद्देशानं हे विधेयक मांडलं आहे. आपल्या अर्थसंकल्पीय भाषणात अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी नवं प्राप्तिकर विधेयक आणण्याची घोषणा केली होती. दरम्यान, लोकसभेचं पहिल्या टप्प्याचं कामकाज पूर्ण झाल्यामुळ येत्या १० मार्च पर्यंत सदनाचं कामकाज स्थगित करण्यात आलं. वक्फ (दुरुस्ती) विधेयक २०२४ बाबतच्या संयुक्त समितीचा अहवाल आज संसदेच्या दोन्ही सभागृहात मांडण्यात आला. विरोधी सदस्यांनी केलेल्या गदारोळामुळ लोकसभेचं आणि राज्यसभेचं कामकाज तहकूब करण्यात आलं होतं.**

--------------------------------

**प्रधानमंत्री नरेंद्र मोदी-अमेरिका दौरा**

**फ्रान्सच्या यशस्वी भेटीनंतर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आपल्या दौऱ्याच्या दुसऱ्या टप्प्यात आज पहाटे वॉशिंग्टन इथं पोहोचले. अमेरिकेच्या राष्ट्रीय गुप्तचर**

विभागाच्या संचालक तुलसी गबार्ड यांनी आज वॉशिंग्टन डीसी इथं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. यावेळी त्यांनी द्विपक्षीय गुप्तचर सहकार्य, विशेषतः दहशतवाद विरोधी कारवाया, सायबर सुरक्षा, उदयोन्मुख धोके आणि धोरणात्मक गुप्तच रमाहितीचं आदान-प्रदान या क्षेत्रांमध्ये सहकार्य वाढवण्यावर चर्चा केली.भारत आणि अमेरिकेचे नागरिक परस्पर हितासाठी आणि पृथ्वीच्या चांगल्या भविष्यासाठी एकत्र येऊन काम करतील असं मोदी यांनी समाज माध्यमावर म्हटलं आहे.

--------------------------------

जलसंधारण

राज्यात जलसंधारण विभागाच्या माध्यमातून राबविण्यात आलेले 'जलयुक्त शिवार अभियान' हे महत्वाकांक्षी अभियान आहे. या अभियानाच्या माध्यमातून राज्यात लोकसहभागातून झालेली कामे ही जलक्रांतीच्या दिशेन पडलेल पाऊल आहे, अस प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केल. मृदा आणि जलसंधारण विभाग अंतर्गत आयोजित जलसंधारण अधिकारी गट ब नियुक्ती पत्राचे वितरण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. तर प्रातिनिधीक स्वरुपात सहा उमेदवारांना प्रत्यक्ष नियुक्ती आदेशाचे वितरण करण्यात आले. जलसंधारण क्षेत्रात होत असलेल्या कामांबाबत फडणवीस यांनी माहिती दिली....

*जलसंधारणाचे जे काम आहे, हे आपल्याला दर तीन वर्षांनी, चार वर्षांनी पुन्हा ते रिजुवनेट करावं लागतं. कारण आपली जी माती आहे, आपले जे सॉईल आहे, मृदा आहे, ते वाहत असते ती परत येत असते ती पुन्हा त्याठिकाणी सिलटेशन होत असतो आणि म्हणून हे जे स्ट्रक्चर असतात आता या सगळ्या स्ट्रक्चरच मॅपिंग हे आपण सॅटलाईटच्या माध्यमातून करतोय. याला आपण आपल्या गतीशक्तीच्या फ्लॅटफॉर्म वर देखील पण आणतो त्यामुळे अगदी सायन्टिफिक पद्धतीने आणि कुठल्याही प्रकारचा गैरप्रकार त्याच्यात होणार नाही, अशा पद्धतीने हे काम आपण येत्या काळापर्यंत करणार होते.*

जलसंधारण विभागामध्ये निवड झालेल्या या 601 अधिकाऱ्यांचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी अभिनंदन केले आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी ते म्हणाले, जलसंधारण विभाग हा शेतकऱ्यांच्या जीवनामध्ये परिवर्तन घडवणारा विभाग आहे. या विभागाच्या परिवारामध्ये नवनियुक्त झालेल्या अधिकाऱ्यांनी सामान्य माणूस आणि शेतकऱ्यांच्या जीवनात परिवर्तन घडविण्याचे ध्येय

बाळगावे. शासनाच्या माध्यमातून सामान्यांची सेवा करण्याची आपणास संधी मिळाली आहे. या संधीचे सोनं करून जनसामान्यांच्या चेहऱ्यावर हसू फुलवाव अस ते म्हणाले. राज्यात 75 हजार नोकर भरती करण्यास सुरुवात केले होती. प्रत्यक्षात सुमारे 1 लाख 50 हजार नोकर भरती होत असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

---------------------------------

परीक्षा पे चर्चा'

यंदाच्या 'परीक्षा पे चर्चा' या मालिकेतील आजच्या तिसऱ्या भागात टेक्निकल गुरुजी म्हणून प्रसिद्ध असलेले गौरव चौधरी आणि एडलवाईज म्युच्युअल फंडच्या मुख्य कार्यकारी अधिकारी राधिका गुप्ता यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केलं. यावेळी टेक्निकल गुरुजी यांनी कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर एक साधन म्हणून करायचा सल्ला देत,त्यापलीकडे जाऊन आयुष्य आनंदान जगण्याच्या कलेवर भर दिला. समाजमाध्यमवरील पोस्ट रिल्स बद्दल अधिक विचार न करण्याचा सल्ला देत फियर ऑफ मिसिंग आऊट 'फोमो' बद्दल देखील त्यांनी चर्चा केली......

*आपको पता है हमारे दिमाग में केमिकल्स हिट होते हैं असली के केमिकल्स हम उसको बोलते हैं डोपामाइन जब भी आप कुछ देखते हैं एक अच्छी सी आपको कुछ दिखी रील और तुरंत आपके दिमाग में इन्स्टंटली स्पाइक जाता है। अगर आपको कुछ ऐसा दिखा जहां पे आपको कोई दोस्त दिखा रहा है जो कहीं घूमने गया हुआ है और आपने वो देखा।तो कहीं ना कहीं दिमाग में इन्स्टंटली एक स्ट्रेस हार्मोन भी क्लिक हो जाता है। बहुत बार कि यार मैं कब घूमने जाऊंगा या मेरा ट्रिप कब होने वाला है एक फोमो हो जाता है। बहुत बार आप अगर मुझे भी देख रहे हैं ऑनलाइन तो वो फोटो एक खास तरीके से क्लिक करके पोस्ट हुई है इंस्टाग्राम के लिए, मैं हमेशा वैसे नहीं रहता हूँ। हाँ, हमेशा मैं ऐसे ही आपसे बात कर रहा हूँ।*

---------------------------------

जागतिक रेडिओ दिवस

जागतिक रेडिओ दिवस आज साजरा केला जात आहे.रेडिओच्या महत्त्वाबद्दल लोकांमध्ये जागरूकता निर्माण करणं आणि रेडिओद्वारे माहिती मिळवण्याकरता प्रोत्साहन देण्यासाठी, दरवर्षी हा दिवस साजरा केला जातो. 'रेडिओ आणि हवामान बदल' ही यंदाच्या जागतिक रेडिओ दिनाची संकल्पना आहे.पंतप्रधान

नरेंद्र मोदी यांनी रेडिओ दिनाच्या शुभेच्छा दिल्या आहे. रेडिओ हे सर्जनशीलतेचा उत्सव साजरं करणारं एक शक्तिशाली माध्यम असल्याचं, त्यांनी समाज माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे. रेडिओ जगताशी संबंधित सर्वांचं पंतप्रधानांनी कौतुक केलं.येत्या २३ तारखेला आकाशवाणीवरच्या मन की बात या कार्यक्रमासाठी नागरीकांना विचार आणि सूचना पाठवाव्या, असं आवाहन त्यांनी केलं आहे. जागतिक रेडिओ दिनानिमित्त माहिती आणि प्रसारण सचिव संजय जाजू यांनी आज नवी दिल्ली इथं 'रेडिओ महोत्सव २०२५ चं' उद्घाटन केलं. यावेळी आकाशवाणीच्या महासंचालक डॉ.प्रज्ञा पालीवाल गौर उपस्थित होत्या.

--------------------------------

खाण कामगार

आपल्या देशात 74% वीज निर्मिती ही औष्णिक आणि कोळसा आधारित विद्युत प्रकल्पाद्वारे तयार होत असून आपला देश हा कोळसा उत्पादनात तसच वापरात चीन नंतर दुसऱ्या क्रमांकावर आहे. आपल्याला विकसित राष्ट्र बनण्यासाठी कोळसा उत्पादन वाढवण गरजेच असल्याच प्रतिपादन केंद्रीय कोळसा आणि खाण मंत्री जी.किशन रेड्डी यांनी आज नागपूर येथे केल. भारतीय मजदूर संघाच्या अखिल भारतीय कोळसा मजदूर संघटनेचे दोन दिवसीय अधिवेशन नागपुरातील रेशीम बाग येथील डॉ.हेडगेवार स्मृती सभागृहात आज संपन्न झाले त्यावेळी समारोपीय कार्यक्रमाला ते उपस्थित असताना प्रसारमाध्यमांशी बोलत होते. क्रिटीकल मिनिरल अर्थात महत्वपूर्ण खनिज बद्दल होत असलेल्या प्रयत्नांबद्दल देखील त्यांनी माहिती दिली -----

*भारत को आज क्रिटिकल मिनरल्स का बहुत जरूरत है। क्रिटिकल मिनरल्स के लिए लिथियम जैसे कॉपर के जैसे जो डिमांड है आज देश में।उसका लगभग 100% लिथियम इंपोर्ट करते हैं। 1% प्रोडक्शन भारत में अभी लिथियम का प्रोडक्शन बढ़ाने के लिए भी प्रयास कर रहे हैं।*

दरम्यान, 'सीएबीआयएल (CABIL) काबील' या सार्वजनिक क्षेत्र उपक्रमाच्या माध्यमातून अर्जेंटिना सारख्या देशातून आपण क्रिटिकल मिनरल्स चे ब्लॉक मिळवत आहोत अस देखील रेड्डी यांनी सांगितलं.

बाल रक्षा अभियान

बालकांच्या हक्कांचं संरक्षण आणि सुरक्षित भविष्यासाठी महाराष्ट्र राज्य बालहक्क संरक्षण आयोगाकडून सोमवारपासून बालरक्षा अभियान राबवण्यात येणार आहे. बालहक्क संरक्षण आयोगाच्या अध्यक्षा सुशीबेन शहायांनी काल ही

घोषणा केली. हा उपक्रम फेब्रुवारी आणि मार्च २०२५ या कालावधीत संपूर्ण महाराष्ट्रात राबवण्यात येणार आहे. त्याचबरोबर मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे, नागपूर, अकोला,नाशिक, पुणे, छत्रपती संभाजीनगर या जिल्ह्यांमध्ये बालरक्षा अभियान कार्यशाळांचं आयोजन केलं जाणार असल्याचं त्यांनी सांगितलं.

--------------------------------

उदय सामंत

मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी नवी दिल्लीत जवाहरलाल नेहरू विद्यापीठाला भेट दिली. जेएनयु विद्यापीठातल्या छत्रपती शिवाजी महाराज अध्यासनासाठी या आर्थिक वर्षात दोन कोटी रुपये देण्यात येतील, तर पुढच्या आर्थिक वर्षात सात कोटी रुपये देण्यात येणार असल्याचं सामंत यांनी सांगितलं. तालकटोरा स्टेडियम इथं होणाऱ्या ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या स्थळाचीही त्यांनी पाहणी केली. २१ ते २३ फेब्रुवारी या कालावधीत हे संमेलन होणार आहे. सामंत यांनी साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष शरद पवार यांची त्यांच्या निवासस्थानी भेट घेतली.

--------------------------------

हवामान

विदर्भातील जिल्ह्यांमध्ये उन्हाची तीव्रता हळूहळू वाढू लागली असून आज वाशिम जिल्ह्यात 36 अंश सेल्सिअस इतक्या सर्वाधिक कमाल तापमानाची नोंद करण्यात आली. नागपुरात आज 35 पूर्णांक 1 अंश सेल्सिअस इतकं कमाल तापमान नोंदवण्यात आलं, तर यवतमाळ जिल्ह्यात सर्वात कमी 15 अंश सेल्सिअस इतक्या किमान तापमानाची नोंद झाली आहे.

--------------------------------

धान रोवणी

भंडारा जिल्ह्यातील नदीखोऱ्यात उन्हाळी धान रोवणीला प्रारंभ झाला असून संपूर्ण फेब्रुवारी महिना महिला मजुरांना काम मिळाले आहे. पाणी टंचाईचा हिशेब करता शेतकऱ्यांना शक्य तितक्या शेतात धान लावगडीचा निर्णय घेतला आहे. जिल्ह्यातील अनेक भागात उन्हाळी धानाचा हंगाम जोरात आला आहे. यामुळे रोवणी करिता महिला मजुरांची तीव्र टंचाई या भागात जाणवत आहे. किमान २० दिवस हा हंगाम राहणार असून शेतकऱ्यांचे संपूर्ण कुटूंब शेतात राबत आहे.

**स्वतंत्र सिंचन व्यवस्थेतून शेतकरी किमान २ एकरापर्यंत उन्हाळी धान लावण्याच नियोजन करतो.**

**--------------------------------**

**समुपदेशन-सल्ला शिबिर**

**महावितरणच्या नागपूर परिमंडलातर्फ़े मृत किंवा वैद्यकीय कारणास्तव मुदतपुर्व सेवानिवृत्ती घेतलेल्या कर्मचाऱ्यांच्या वारसांसाठी अनुकंपा तत्वावर नियुक्ती किंवा अंतिम देयकाबाबत समुपदेशन-सल्ला शिबिराच नुकच आयोजन करण्यात आल होत. या शिबिरात वारसांना त्यांचे दिवंगत कर्मचाऱ्यांच्या मृत्युनंतर मिळणाऱ्या विविध लाभांची, त्यांची नौकरी करीता असलेल्या निश्चित जेष्ठता क्रमांकाबाबत माहिती देण्यात आली.**

**--------------------------------**